# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

१३ वा मजला, केंद्र क्र.१ जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई ४०० ००५ **दूरध्वनी २२१६ ३९६४/२२१६ ३९६५**
**ई-मेल : mercindia@merc.gov.in**
**संकेत- स्थळ: www.merc.gov.in**


**जाहिरात क्र. २१/२०२२-२३**

## जाहीर सूचना

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एइएमएल सिप्झ लि.च्या सिप्झ एसईझेड,मुंबई येथील बहु-उत्पादन विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२३ वर अभिप्राय मागविण्याबाबत**

मे.एईएमएल सिप्झ लिमिटेड (एएसएल) यांना, मुंबईतील सिप्झ एसईझेडसाठी एमआयडीसी द्वारे अनुक्रमे दि. २० जानेवारी, १९७५ आणि २८ जून, २००५ रोजीच्या भाडेपट्टा विलेखा अन्वये भाडेपट्टयाने दिलेल्या १०३ एकर क्षेत्रासाठी, भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून "विकासक" म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (बी) सह एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील उप-कलम (१) नुसार, एएसएल हे उपरोक्त एसईझेड क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी एक मानीव वीजवितरण परवानाधारक आहेत. आयोगाने, सन २०२२ च्या प्रकरण क्र. २ मध्ये दि. ६ जून, २०२२ रोजी दिलेल्या आदेशान्वये एएसएलच्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, आयोगाने प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एइएमएल सिप्झ लि.च्या सिप्झ एसईझेड, मुंबई येथील बहु-उत्पादन विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२३ हे प्रारुप विनियम तयार केले आहेत.

सदर प्रारुप विनियमांची प्रत आयोगाच्या **www.merc.gov.in** (**https://www.merc.gov.in/ regulation_type/draft-regulations/**) या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. आयोग याद्वारे वरील प्रारुपावर जनता/संबंधितांकडून सूचना आणि/किंवा हरकती मागवित आहे, ज्या आयोगाच्या संकेत-स्थळावरील 'e-public consultation' या टॅबद्वारे या सूचनेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अपलोड कराव्यात (**www.merc.gov.in/e-public-consultation**). या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२ वर किंवा **suggestions@merc.gov.in** या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.

**'E-Public Consultation'** या टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केलेल्या व्यक्तीस त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत, **मा. सचिव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५** या पत्त्यावर या सूचनेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पाठवावी. **३० मार्च, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० नंतर** प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/ हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८/०२/२०२३

**माननीय सचिव, मविनिआ**